# युवक क्रांती दलाचे नम्र आवाहन

## हर जोर जुल्म के टक्कर में संघर्ष हमारा नारा है।

युक्रांद

लोकशाही, समाजवाद, धर्म निरपेक्षता ही प्रमुख मूल्ये भारतीय समाजात रुजविण्याच्या दृष्टीने सम्यक समाजवादी क्रांतीसाठी संघटनेने स्वतःला बांधून घेतलेले आहे. शासनसंस्था आपल्या ताब्यात आणू इच्छिणाऱ्या खऱ्याखुऱ्या समाजवादी मित्रांबद्दल वा पक्षाबद्दल संघटनेच्या मनात कुठल्याही तऱ्हेची उपहासाची व उपेक्षेची भावना नाही. राजकीय पक्ष म्हणून त्यांना शासनसंस्था ताब्यात आणावीच लागेल. पण ते काम मात्र युक्रांद करणार नाही, कारण युक्रांदचे कार्यक्षेत्र वेगळे व मूलभूत म्हणून अधिक मोलाचे आहे. शासनसंस्था समाजावर व दलितांवरच उलटू नये म्हणून युक्रांद नेहमी दक्ष आहे. राज्यकर्त्यांच्या हातून घडलेल्या सर्व प्रमादांचा युक्रांद धिक्कार करीत आहे. निवडणुका वा अन्य मार्गांनी राज्यसत्ता स्वतःच्या हाती आल्यानेच भारतात समाजवादी क्रांती घडेल असा दावा युक्रांद करीत नाही. जे जे लोक उत्पादन साधने समाजाच्या मालकीची व्हावीत हे तत्व या ना त्या कारणाने मानीत नाहीत, ते समाजवादी नसून जातीसंस्थेचे व भांडवलशाहीचे पित्ते आहेत असे युक्रांद मानते. भारतात जोपर्यंत राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अन्य सत्ता आणि सत्तास्थाने क्रांतीशील समाजवादी दलित जातींकडे जात नाहीत तोपर्यंत क्रांतीला प्रारंभसुद्धा झाला असे युक्रांद मानणार नाही.

सत्ताधारी उत्पादनवाढीच्या गोंडस नावाखाली संघटन करण्याचा आणि न्याय्य संप करण्याच्या अधिकाराची गळचेपी करून अत्यंत हीन पातळीवर राजकारण करून कामगार संघटनांमध्ये एकपक्षीय मक्तेदारी आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या गोंडस नावाखाली खेड्यापाड्यातील शाळा बंद करून सर्वहारा वर्ग केवळ शिक्षणापासूनच नव्हे तर साक्षरतेपासून दूर ठेवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. खेड्यांतील दलितांवरचे अत्याचार आणि दिवसाढवळ्या राजकीय कार्यकर्त्यांचे पडणारे खून हे राज्य थांबवू शकत नाही, सत्ता टिकविण्यासाठी आणीबाणी लावून सामान्य जनतेचे लेखनस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या सरकारचा युक्रांद निषेध करीत आहे. दलित जनतेची क्रयशक्ती नष्ट करून उत्पादनवाढीचा जयघोष करणाऱ्यांना आपली भांडवलशाही राजवट प्रस्थापित करून देणे म्हणजेच कामगारवर्गाचा संघटन व न्याय्य संप करण्याचा अधिकार सोडून देणे होय.

म्हणून युक्रांद नम्र आवाहन करीत आहे की,

(१) लोकशाहीच्या विरोधकांना सत्तेवर जाण्याची संधी देऊ नका.

(२) सामान्य जनतेला लेखनस्वातंत्र्य व्यक्तिस्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य देणाऱ्यांनाच निवडून द्या.

(३) गरिबी हटावच्या नावाखाली लोकशाहीचा बुरखा पांघरून हुकूमशाहीची वाटचाल करणाऱ्यांना वेळीच आवरा.

(४) मतदारांना अविश्वासार्ह वाटणाऱ्या उमेदवारांना परत बोलावण्याचा अधिकार (Right to Recall) मागून घ्या.

(५) सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांना वेळीच आवरा.

तसेच मतदार नसलेल्या पण उद्याच्या राष्ट्रबांधणीच्या कार्यक्रमात अस्तित्व असलेल्या युवक युवतींनी या राजकारणाकडे असे उदासीनतेने न पाहता जनजागृतीच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे नम्र आवाहन युक्रांद करीत आहे.

**— युवक क्रांती दल**

मुद्रक, प्रकाशक : **डॉ. रत्नाकर महाजन,**
९४० ब सदाशिव पेठ,
पुणे ३०

Internal
12/11/1985

मध्यवर्ती कार्यकारिणी पत्रक

युवक क्रांती दल महाराष्ट्र
१२३३/८ आपटे रोड
शिवाजीनगर, पुणे ४११००४
ता. १२/११/८५

स.न.

मध्यवर्ती कार्यकारिणीची बैठक शनि/रविवार दि. २ आणि ३ नोव्हेंबर रोजी या दिवशी पुणे येथे झाली. या बैठकीमध्ये खालील निर्णय घेण्यात आले.

डिसेंबर महिन्यामध्ये २८, २९, ३० या तारखांना युक्रांदच्या सर्व कार्यकर्त्यांचे एक शिबिर मुंबई येथे घेण्यात येईल. शिबिरापूर्वी संघटनेच्या स्थानिक केंद्रामध्ये बैठका घेण्यात येतील. त्याला कार्यकारिणी सदस्यांनी उपस्थित रहावे. कोणत्या केंद्रामध्ये कोणी उपस्थित रहावे हे निश्चित करण्यात आले. बैठकींच्या नियोजित तारखा त्या केंद्रांना आगोदर कळविण्यात येतील.

भारत सरकार यांच्या शिक्षणविषयक प्राथमिक चर्चा होऊन त्यांच्या शिक्षणविषयक आपल्या सूचना कार्यकारिणी सदस्यांनी १५ नोव्हेंबरपर्यंत लेखी पाठवाव्यात.

संघटनेच्या दैनंदिन कामकाजासाठी आर्थिक व इतर साधनसामुग्रीच्या उभारणीसाठी मध्यवर्ती कचेरीने प्रकाशित केलेले पत्रक सहानुभूतीदारांना हाती किंवा पोस्टाने पाठविण्यात यावे. त्यांना सहाय्य करण्याचे आवाहन करावे, व आवश्यक तर त्यांच्या घरी जाण्यात आणि त्यांच्या बैठका आयोजित कराव्यात.